PRAVARA MEDICAL TRUST
प्रवरा मेडीकल ट्रस्टचे
आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज
आयुर्वेद कॉलेज कॅम्पस, शेवगांव जि.अहमदनगर (महा.) ४१४५०२
फोन : ०२४२९-२२३०३१,२२१९६६ फॅक्स-०२४२९-२२३३१९ E-mail : pravara_acscs@rediffmail.com

**“सिंधु करंडक २०२४”**

**कै. सिंधुताई एकनाथराव विखे पाटील राज्यस्तरीय अंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा२०२४**

# अहवाल

महाविद्यालयांमध्ये दि. ०६ मार्च २०२४रोजी “सिंधु करंडक २०२४”ही कै. सिंधुताई एकनाथराव विखे पाटील राज्यस्तरीय अंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २०२४आयोजित करण्यात आली. बाईंनी प्रवरेच्या परिसरात महिलाच्या प्रगतीसाठी १९८८साली ‘प्रियदर्शनी ग्रामीण महिला मंडळ ’ च्या माध्यमातून कार्य केले. या महिला मंडळाच्या माध्यमातून विविध उपक्रम आयोजित करून प्रवरा परिसरातील महिलांना स्वनिर्मित व स्वअवकाश निर्माण करून दिले. हा प्रवरेच्या सामाजिक उत्थानाचा प्रेरणास्त्रोत सदैव विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्हावा या उदात्त भूमिकेतून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

- **स्पर्धेसाठी विषय:**

१) भारतीय संस्कृती विविधतेतून एकता

२) वसुधैव कुटुम्बकम आंतरराष्ट्रीय सहजीवनाचे मूलतत्त्व

३) भारतातील बदलत्या सामाजिक रचनेत स्त्रियांची भूमिका

४) माध्यमांचा वाढता वापर व कुटुंबातील संवादहिनता

या विषयावरती सहभागी विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण व चिंतनशील मांडणी केली. या स्पर्धेमध्ये राज्यभरातील विविध २५ महाविद्यालयाचे विद्यार्थी स्पर्धक सहभागी झाले होते. या करंडकाचे उद्घाटनआर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज कोल्हार च्या प्राचार्य व सा. फु. पु. वि. पुणे च्या अहमदनगर उपकेंद्र च्या समन्वयक समिती सदस्य मा. डॉ. जयश्री सिनगर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचसाठी प्रमुख उपस्थिती म्हणून परवर मेडिकल ट्रस्टचे शैक्षणिक संकुल शेवगाव चे कार्यकारी संचालक मा.श्री. पंजाबराव आहेर साहेब होते. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षपद महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. ओंकार रसाळ यांनी भूषावून या स्पर्धेविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे अध्यक्षपदी बाळासाहेब भारदे विद्यालय प्राचार्य मा. रमेश भारदे तसेच भारतीय कृषक समाज अध्यक्ष मा. श्री. बापूसाहेब भोसले व प्रमुख अतिथी म्हणून शेवगाव शैक्षणिक संकुल चे कार्यकारी संचालक मा. श्री. पंजाबराव आहेर साहेब होते.दादा पाटील कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय आदिनाथनगर, पाथर्डी युय महाविद्यालयाने करंडक पटकावला.

- **स्पर्धेचा अंतिम निकाल:**

- प्रथम क्रमांक: सिद्धी विजयकुमार बाफना- दादा पाटील कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय आदिनाथनगर, पाथर्डी
- द्वितीय क्रमांक: बिस्मिल्ला खलील शेख- कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय कोल्हार.
- तृतीय क्रमांक: रोहित वाकचौरे- कृषी व्यवस्थापकीय महाविद्यालय लोणी

या स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अजित भालसिंग यांनी केले तर आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मोहन परतवाघ यांनी केले. स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. रामदास कातकडे व प्रा. सौ. प्रीती शिनगारे यांनी केले.